फिर्याद **<u>नि.क्र.०१</u>** (१) संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक **५५९/२०१८**
साधना नायट्रोकेम लिमिटेड वि. दिलीप शांतवन पारखे

## <u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २००</u>
## <u>नुसार फिर्यादीची शपथेवर तपासणी</u>

**मी शपथपुर्वक निवेदन करतो की :**

माझे नाव विद्याधर बेडेकर. वडीलांचे नाव : नारायण बेडेकर.

वय : ५५ वर्षे, धंदा : साधना नायट्रोकेम लि. व्यवस्थापक नोकरी.

राहणार : रोहा, तालुका : रोहा, जिल्हा रायगड.

<u>फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. बी. सावंत हजर</u> :-

**०१.** मी दिनांक **०१.०२.२००१** रोजी पर्सनल ऑफिसर म्हणून साधना नायट्रोकेम या कंपनीत नोकरी करीत होतो. आरोपी त्यावेळी आमच्या कंपनीत व्यवस्थापक म्हणून नोकरी करत होता. आरोपी दिनांक **०१.०२.२००१** पासून कंपनीत नोकरीवर रुजू झाला होता. आमच्या कंपनीची मौजे वरसे येथे अनुराधा कॉम्लेक्स नावाचे निवासी संकुल आहे. आरोपीला ए विंगमधील पहिल्या मजल्यावरील ए-३ क्रमांकाची ६७ चौरस मीटर क्षेत्रफळाची निवासी सदनिका सेवेचा भाग म्हणून सेवाकाळासाठी राहण्यासाठी दिली होती. आरोपीला दिलेल्या सदनिकेमध्ये वेगळा वीज पुरवठा दिलेला आहे. आरोपीने दिनांक १३.०८.२०१५ रोजी कंपनीत राजीनामा दिला. आरोपीने राजीनामा दिला त्यावेळी पुढे एक महिना निवासी सदनिकेत राहण्याची परवानगी मागीतली होती. आरोपीला कंपनीने एक महिना सदनिकेत राहण्याची परवानगी दिली होती. आरोपीने दिनांक १३.०९.२०१५ पर्यंत निवासी सदनिका सोडणे गरजेचे होते. आरोपीने एक महिन्याची मुदत संपूनही सदनिका सोडली नाही.

**०२**. आम्ही आरोपीला तोंडीदेखील सदनिका सोडण्यासाठी कळविले. आम्ही आरोपीला सदनिका सोडण्यासाठी दिनांक ०३.०५.२०१८ रोजी कंपनीमार्फत पत्र पाठवले. आरोपीने त्या पत्राला खोडसाळपणे उत्तर दिले. आम्ही पुन्हा त्याला जून, २०१८ मध्ये सदनिका सोडण्यासाठी स्मरणपत्र पाठवले. आरोपीने त्या पत्रालाही ऑगस्ट, २०१८ मध्ये खोडसाळपणे उत्तर पाठवले. आम्ही आरोपीला पुन्हा ऑगस्ट, २०१८ मध्ये विधीज्ञांमार्फत नोंदणीकृत टपालाने नोटीस पाठवून सदनिका खाली करण्यासंदर्भात कळवले. आरोपीला टपाल खात्यामार्फत पोष्टमनने सुचना देवूनही त्याने नोटीस स्विकारली नाही. म्हणून टपाल खात्याकडून कंपनीला नोटीस परत आली.

**०३**. मी कंपनीच्या वतीने ऑगस्ट, २०१८ मध्ये आरोपीच्या राहत्या सदनिकेच्या दरवाजावर नोटीस चिकटवली. आरोपीच्या सदनिकेवर नोटीस चिकटवूनही त्याने दुर्लक्ष केले. आम्ही त्यामुळे आरोपीला दिलेली सदनिका अन्य लाभार्थी अधिका-यांना देवू शकलो नाही. आरोपीने सप्टेंबर, २०१५ पासून वीज बिल न भरता थकीत ठेवले होते. कंपनीने आरोपीच्या सदनिकेचे वीज बिल जवळपास रक्कम रुपये ५५,६००/- (पंचावन्न हजर सहाशे मात्र) भरले. आरोपीला वाटप केलेल्या सदनिकेला मौजे वरसे या गावात महिन्याला साधारण दहा हजार रुपये भाडे मिळू शकते.

**०४**. आरोपीने कंपनीची सदनिका रिकामी करुन द्यावी, कंपनीने त्याच्या सदनिकेचे भरलेले वीज बिल कंपनीला द्यावे आणि कंपनीला सप्टेंबर, २०१५ पासून प्रति महिना रक्कम रुपये दहा हजार प्रमाणे भाडे द्यावे अशी माझी विनंती आहे. मला कंपनीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आरोपीविरुद्ध खटला दाखल करण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

फिर्याद **<u>नि.क.०१</u>** (३) संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक **५५९/२०१८**
साधना नायट्रोकेम लिमिटेड वि. दिलीप शांतवन पारखे

**०५.** माझी फिर्याद पत्रकावर सही आहे. मी फिर्यादीत नमूद केलेला मजकूर खरा व बरोबर आहे.

मला माझी तपासणी विधीज्ञांच्या हजेरीत वाचून दाखवली. मी माझी तपासणी वाचून पाहिली. माझी तपासणी बरोबर लिहली आहे, म्हणून मी खाली सही करतो.

---**स्वाक्षरी**---
फिर्यादीची सही व तारीख

माझे समक्ष

---**स्वाक्षरी**---
(सुभाष ल. फुले)
(एम एच आर जी ०००९ - २१२५)
प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.
जिल्हा - रायगड.

दिनांक : ०१.०२.२०१९.
ठिकाण : रोहा.